ISSN : 2231 4377
(Peer Reviewed Journal)

शब्दाली प्रकाशन
पुणे-५८.


SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन

वर्ष : १० वे अंक : चौथा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२१



वितरण क्षेत्र : दिल्ली, पश्चिम बंगाल (कलकत्ता), उत्तर प्रदेश (वाराणसी), कर्नाटक, गोवा, गुजरात (वडोदा), तेलंगणा (हैदराबाद), बंगलोर, पुणे, नगर, नाशिक, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, गुहागर, यवतमाळ, कोल्हापूर, सातारा, सांगली, कराड, सोलापूर, [illegible], परभणी, जालना, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, अकोला, नांदेड, जळगाव, धुळे, [illegible], चंद्रपूर, [illegible]

■ एसडीएम/पुणे/एसआर/६१/६/४/२०१३ ■ आयएसएसएन : २२३१-४३७७

शब्दाली प्रकाशन पुणे-५८.

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

'मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच'

■ संपादक :
**प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन**
(एम.ए., एम.फिल., पीएच.डी. - मराठी)

■ वर्ष : १० वे ■ अंक : चौथा ■ जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२१

■ **प्रकाशक, मालक, मुद्रक :**
**सुनिता शैलेश त्रिभुवन** (एम.ए. - मराठी)

■ **पत्र व्यवहारचा पत्ता : शब्दाली प्रकाशन**
बी-५/२०६/दुसरा मजला, राहुलनिसर्ग, अतुलनगर,
वारजे-माळवाडी, पुणे - ४११ ०५८.

■ **दूरभाष : ९९२२१ ३०१५७, ७८८८२ ६२३१०**

■ **Email : dr.shailesh.tribhuwan@gmail.com**

■ **टाईपसेटिंग :** गणेश ग्राफिक्स, पुणे.

■ **मुद्रक :** गणेश ग्राफिक्स, पुणे. दूरभाष : ९०११७७३३२२

■ **मुखपृष्ठ :** संपादक

■ **मुद्रित शोधन :** प्रा. संग्राम गोसावी, दूरभाष ८२३७७६६००९

■ **वर्गणी :** वार्षिक: व्यक्ती: रु.४००/- संस्था : रु.४५०
पाच वर्षे : व्यक्ती: रु.२,०००/- संस्था: रु.२,२५०

■ लेख : ७०८ श्रीलिपीमध्ये व ओपन फाईलमध्ये पाठवावेत.

■ **वार्षिक व पंचवार्षिक वर्गणी :**
आपल्या स्थानिक बँकेत - **बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेनगर, पुणे. (IFCS Code - MAHB 00 00 970)**
**'शब्दाली प्रकाशन' पुणे. (खाते क्र. : 60058138435)**
या खात्यावर जमा करून सदर पावती
शब्दाली प्रकाशनाच्या पत्त्यावर पाठवावी.

■ **सल्लागार मंडळ (Adviser Committee)**

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले (पुणे) - दूरभाष: ८८८०५७७०८८
डॉ. रावसाहेब कसबे (नासिक) - दूरभाष: ९८५०५४७५७८
डॉ. यशवंत मनोहर (नागपूर) - दूरभाष: ८००७१५५५७७
डॉ. निशिकांत मिरजकर (पुणे) - दूरभाष: ९९७०१८४५६२
प्रा. दत्ता भगत (औरंगाबाद) - दूरभाष: ९८८१२३००८४
प्रा. उत्तम कांबळे (नासिक) - दूरभाष: ९८८१०९११४३
प्रा. डॉ. आनंद पाटील (कोल्हापूर) - दूरभाष: ९४०४१४०९९५
प्रा. डॉ. मनोहर जाधव (पुणे) - दूरभाष: ८७९६६४३८६४

■ **परीक्षण समिती (Review Committee)**

प्रा. डॉ. संजय करंदीकर (गुजरात) - दूरभाष: ९९०९९१६९७८
प्रा. डॉ. अनिल सपकाळ (मुंबई) - दूरभाष: ८३५५९३१०९२
प्रा. डॉ. सुधाकर शेलार (अ.नगर) - दूरभाष: ९८९०९१३२३६
प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे (नागपूर) - दूरभाष: ८१४९३१२१३४
प्रा. डॉ. प्रभाकर देसाई (पुणे) - दूरभाष: ९८८१९०८०२०
प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर (नांदेड) - दूरभाष: ७५८८४१२१५३

■ **संपादक मंडळ (Editor Committe)**

प्रा. डॉ. सुनिल चंदनशिवे (कोल्हापूर) - दूरभाष: ९८२२२०९४८९
प्रा. डॉ. सारिपुत्र तुपेरे (सोलापूर) - दूरभाष: ९८२२९८४३१३
प्रा. डॉ. तुषार चांदवडकर (नासिक) - दूरभाष: ९४२२९४३६५२
प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे (रत्नागिरी) - दूरभाष: ९९२१८४६११८
प्रा. विनय मडगावकर (गोवा) - दूरभाष: ८३०८४७७६६४
प्रा. डॉ. संजय कांबळे (कर्नाटक) - दूरभाष: ९१६४३५८४८९
प्रा. डॉ. सुमेध रणवीर (प. बंगाल) - दूरभाष: ७५८५९५०३६५
प्रा. डॉ. ताहिर पठाण (उ. प्रदेश) - दूरभाष: ९९२२०२६६९८
प्रा. डॉ. अरुण कुलकर्णी (तेलंगणा) - दूरभाष: ८१२१७४७५४४

■ *या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी सल्लागार मंडळ, संपादकीय मंडळ, संपादक, मालक मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

■ *या त्रैमासिकात लेख, शोधनिबंध, कविता छापण्यासाठी कोणतीही रक्कम स्वीकारली जात नाही. परंतु सभासदत्व अनिवार्य आहे.*

■ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

■ या अंकातील लेख करारबद्ध असून इतरत्र पूर्व परवानगी शिवाय छापता येणार नाहीत. (संपादक)

नीला सत्यनारायण पूर्वाश्रमाच्या नीला मांडके एक तत्वनिष्ठ आणि सत्यनिष्ठ प्रशासकीय अधिकारी म्हणून ४२ वर्षांची उत्तम कामगिरी करणाऱ्या म्हणून सर्वज्ञात आहेत. परंतु उत्तम प्रशासकीय अधिकारी असणाऱ्या नीला सत्यनारायण ह्या उत्तम साहित्यिक म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. आजवर त्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषेतून विपुल लेखन केले आहे. त्यात कवितेची ९ पुस्तके तर कथा कादंबरी, ललित लेखन यावरची १३ पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहे.

आपल्या देशात अनेक स्त्रिया ह्या प्रशासन, राजकारण, समाजकारणामध्ये कार्य करताना दिसता अगदी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी ते महिला राष्ट्रपती प्रतिभाताई, किरण बेदी, मीरा बोरवणकर अशा महिलांची कारर्कीर्द वाखाणण्यासारखी आहेच त्यापैकी १९७२-७३ ला आय.ए.एस. परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतीय प्रशासन सेवेत प्रवेश करणाऱ्या नीला सत्यनारायण यांना प्रशासकीय सेवेचा चांगला व वाईट अनुभव घेता आला. वेळप्रसंगी संघर्ष करावा लागला. एक महिला प्रशासकीय अधिकारी म्हणून सत्वपरीक्षा द्यावी लागली अग्निदिव्य करावे लागले. ते 'जाळरेषा' या आत्मकथनपर पुस्तकातून त्यांनी अनुभवकथन केले आहे. त्यांना काम करताना आलेले अनुभव दाहक होते.

प्रत्येक क्षेत्रातील 'स्त्री' ला काम, नोकरी करताना तारेवरची कसरत करावी लागते. आपले कुटुंब, मुलं, संसार सांभाळत नोकरीच्या ठिकाणी प्रामाणिकपणे काम करताना तिची दमछाक होते. पण स्त्री ही अत्यंत सहनशील आहे. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला तोंड देताना करावा लागणारा संघर्ष काहीवेळा होणारा त्रास, काहीवेळा 'स्त्री' म्हणून तिलाच बदनामीला सामोरे जावे लागते. या सर्व प्रसंगांना सामोरे जावे लागते हे अनुभव सांगताना नीला सत्यनारायण आपल्या मनोगतात म्हणतात, 'सीतेला एकदा अग्निदिव्य करायला लागले होते. माझ्या अग्निपरिक्षेचे क्षण मात्र प्रशासकीय सेवेच्या प्रदीर्घ कालखंडात पुन्हा पुन्हा येतच राहिले.' (जाळरेषा, मनोगत, पृष्ठ क्र.७) म्हणजे प्रशासकीय सेवेमध्ये एक स्त्री म्हणून रोजचे 'अग्निदिव्य' पार पाडताना होणाऱ्या वेदना, अपमान, यातना यांचे अनुभव अत्यंत दाहक होते हे नक्की.

नीला सत्यनारायण यांचा मूळ स्वभाव कवीमनाचा, गीत संगीताचा आवड, रंगभूमीचे आकर्षण असणारा, सायन्सला जाऊन वैद्यकीय क्षेत्रात सर्जन व्हावी अशी इच्छा पण वडीलही सरकारी नोकरी त्यामुळे वडीलांची बदली. अखेर आर्टस्ला प्रवेश घेऊन इंग्रजी साहित्यात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. तद्नंतर लोकसेवा स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सत्यनारायण या तेलगू व्यक्तीशी आंतरजातीय विवाह केला. पण तो प्रेमविवाह नव्हता. नीला सत्यनारायण यांनी मसूरी येथे आय.ए.एस. चे प्रशिक्षण घेतले. त्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी पदापासून प्रारंभ केला. त्यानंतर त्यांना महिला विकास आर्थिक महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, सांस्कृतिक कार्य खात्याचे सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, समाजकल्याण विभाग, अॅडीशनल कलेक्टर, अन्न आणि नागरी पुरवठा विभाग, कृषिखाते, वस्त्रोद्योग विभाग, आरोग्य विभागामध्ये पहिली 'स्त्री' सचिव म्हणून पदभार सांभाळला आणि अत्यंत महत्वाचे पद म्हणजे त्या महाराष्ट्राच्या पहिल्या स्त्री निवडणूक आयुक्त होत्या. अर्थात या सर्व पदावर काम करतांना आलेले अनुभव कडू व गोड होते.

**स्त्री प्रशासकीय अधिकारी नीला सत्यनारायण यांचा जीवनसंघर्ष - 'जाळरेषा'(आत्मकथन)**



**प्रा. डॉ. सिंधु आवळे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी.
दूरभाष : ८९९९४४६०५४

**"प्रशासकीय सेवेमध्ये एक स्त्री म्हणून रोजचे 'अग्निदिव्य' पार पाडताना होणाऱ्या वेदना, अपमान, यातना यांचे अनुभव अत्यंत दाहक होते हे नक्की."**



**जाळरेषा: नीला सत्यनारायण**
परचुरे प्रकाशन मंदिर, गोरेगाव, मुंबई ४००००४.
प्रथमावृत्ती २० फेब्रुवारी २०१६, पृ.सं.१७४,
मूल्य रू. २००/-

नीला सत्यनारायण यांचा 'जाळरेषा' या अनुभव कथनपर किंवा आत्मकथपनर पुस्तकात एकूण ५६ प्रकरण आहेत. या विविध अनुभवातून त्यांचे सत्यनिष्ठ आणि तत्वनिष्ठतेचे दर्शन घडले आहे. त्यांचा 'नवलविशेष' या प्रकरणात नीला सत्यनारायण समाजकल्याण खात्याचे सचिव असताना एका मंत्र्याचे गुरू आश्रमशाळा चालवत होते. पण त्या आश्रमशाळेत मुलांची संख्या पुरेशी नसल्याने शासनाचे अनुदानास ही आश्रमशाळा चालवत होते. पण त्या आश्रमशाळेत बाराच मुले होती आणि कागदोपत्री ऐंशी मुले दाखवून बोगस रिपोर्ट सादर केला होता. अर्थात करारी, कर्तव्यनिष्ठ असणाऱ्या सत्यनारायण यांना हे मान्य नव्हते. त्यामुळे त्यांनी अनुदानास नकार दर्शविला इतकेच नव्हे तर मंत्री महोदयांनी त्यांचें 'गुरू' असल्याने गुरूंच्या पाया पडण्यास सांगताच त्या म्हणाल्या, "सॉरी, सर मी कोणाच्या पाया पडत नाही." फक्त हात जोडून नमस्कार करतात. अशा भ्रष्टाचारी गुरूंच्या चरणाला स्पर्श करणे म्हणजे स्वत:चे हात भ्रष्टाचारात बरबटल्यासारखे आहे असा विचार त्यांच्या मनाला शिवला असणार यात शंकाच नाही (जाळरेषा,पृष्ठ १०१)

'न्यायप्रिय' या प्रकरणाला नीला मॅडम राज्य निवडणूक आयुक्त असताना एका पक्षाच्या बड्या नेत्याला त्याच्या महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेमध्ये विशिष्ट बदल करून पाहिजे होता. अनुसूचित जमातीसाठी तो प्रभाग होता. त्याने फोन करून विनंती करून गळ घातली परंतु सत्यनारायण मॅडम यांनी स्पष्टपणे पण नम्रपणे सांगितले, "उद्या लोकांना मी असे बदल केल्याचे कळले तर माझी विश्वासार्हता तर संपून जाईलच, परंतू त्या नेत्याचे राजकीय भविष्यही डागाळून जाईल." (जाळरेषा पृ. ९५) म्हणजे त्या कोणत्याही दबावाला बळी पडल्या नाहीत. आपल्या मताला ठाम राहिल्या.

'अपमानाच्या खुणा' या प्रकरणाला नीला सत्यनारायण एका विभागात उपसचिव असताना मुख्य सचिवांनी त्यांच्यावर दबाव आणला. त्यांचे एक नातेवाईक एका प्रकरणात अडकले होते. त्यामुळे त्या नातेवाईकास शिक्षा होणार होती. त्यामुळे त्या शिक्षेच्या यादीतून नाव काढून टाकण्याचा आग्रह करून दबावतंत्राचा वापर करतात. सत्याची कास धरणाऱ्या सत्यनारायण या दबावाला बधल्या नाहीत. चुकीला त्यांनी कधी पाठीशी घातले नाही. अर्थात या प्रकरणात नीला सत्यनारायण यांना सतत अपमान सहन करावा लागला, बदलीला सामोरे जावे लागले.

अशाचप्रकारे 'मानहानी', 'अग्निदिव्य', 'ताणा-बाणा', 'सत्वपरिक्षा' आदी प्रकरणांमध्ये लेखिकेची सत्यनिष्ठता आणि तत्वनिष्ठता संपूर्ण आत्मकथनपर जाणवत राहते.

नीला सत्यनारायण ह्यांना बऱ्याचवेळा प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी, रंगेल मंत्री यांच्या वासनांध प्रवृत्तीला सामोरे जावे लागले. एवढ्या मोठ्या पदावर असणाऱ्या स्त्रीलाही या वासनांध पुरूषांचे अनुभव आले. मग अन्य गरीब, असहाय महिलांची काय परवड होत असेल हा विचार मनाला अस्वस्थ करतो. 'एक होता राक्षस' 'बॉस' आदी प्रकरणांमध्ये हे अनुभव त्यांनी कथन केले आहेत. 'बॉस' या प्रकरणात सचिवालायातील एक ज्येष्ठ सचिव बाईलवेडा, बाहेरख्याली, रेसचा शौक आणि उंची जीवनाची चटक असणारा होता. कामानिमित्त सत्यनारायण यांना त्यांच्याकडे नेहमी जावे लागत असे. त्या सचिवाने सवयी व स्वभावाप्रमाणे सत्यनारायण ह्यांना आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. त्यांना उंची, फॉरेनच्या साड्या देण्याचे प्रलोभन समोर ठेवले. नीला मॅडम यांनी एवढ्या महागड्या साड्या घेणं मला परवडणार नाही असे सांगताच, अशा शेकडो साड्या तुमच्यावरून ओवाळून टाकीन असे म्हणताच, सत्यनारायण मॅडम प्रचंड संतापल्या व म्हणाल्या, "मला नाईलाजाने तुम्हाला थोबाडीत मारावी लागेल."(जाळरेषा, पृ.३५) असे म्हणता आपला दुर्गावतार दाखविला. म्हणजे स्त्रीला दुबळी समजणाऱ्या किंवा स्वत:च्या हातातील खेळणं समजणाऱ्या वासनांध पुरूषांना एक चांगली चपराक बसली आहे.

प्रस्तुत आत्मकथन हे भाषावाङ्मयाच्या दृष्टीने अभ्यासताना असे लक्षात येते, नीला सत्यनारायण ह्या प्रशासकीय अधिकारी असल्या तरी वाङ्मय आणि साहित्याची जाण त्यांच्या निवेदन शैलीमध्ये. प्रसंगावर्णनात आणि अनुभव कथनात दिसून येते. त्यांनी प्रकरणाला दिलेले नाव उदा. 'देव तारी त्याला कोण मारी', 'सुंठीवाचून', 'हेचि फळ काय मम तपाला' किंवा 'दुनिया झुकती है', इस हाथ से दे उस

हाथ से ले' या मराठी- हिंदी मधील वाक्प्रयोगांचा केलेला सहज उपयोग या प्रकरणातील आशयाला सूचक आहे. हे अनुभव सहज साध्या सोप्या भाषेत मांडताना कुठेही दुर्बोधता, गूढता येत नाही. जे-जे अनुभवले ते-ते मांडले. कोणताही आडपडदा न ठेवता. 'जाळरेषा' हे या आत्मकथनाचे शीर्षकही आशयाशी सुसंगत व समर्पक वाटते.

एकूणच हे आत्मकथन मराठी आत्मकथनाच्या प्रांतामध्ये एक मानाचे स्थान प्राप्त करील अशी अपेक्षा.

---

**पान नं. १२ वरुन** त्यांना आस्था आहे. पण त्यांच्या पलीकडे जाऊन मानवी अस्तित्वाच्या पातळीवरून ते व्यक्त होऊ पाहतात. जगण्याच्या गुंतागुंतीचं व्यामिश्रपण त्यांना नकोस होतं. पारदर्शी जगण्याची आस त्यांना लागते. साहजिकच त्यांची कवितेची भाषा देखील पारदर्शी होते. सरळ साध्या भाषेतून ते व्यक्त होऊ लागतात. भावगर्भ बोलत, धावती लय ही पाटील यांच्या काव्यशैलीची वैशिष्ट्ये जाणवतात.

'अंतरीचा भेद'मध्ये कविमनाच्या बदललेल्या जाणिवा लक्षात येतात. प्रदीप पाटील यांची कविता इथे चिंतनशील झाली आहे. मानवी जगण्यात येऊ लागलेले उदास भकासपण,दुभंगलेपण हा पाटील यांच्या काव्यानुभवाचा केंद्रबिंदू झाला आहे.जगण्यातील समृद्ध सौंदर्य हरवत चालल्याची खंत त्यांची कविता व्यक्त करते.

पाटील यांची कविता समकालीन कवितेशी नातं सांगणारी आहे. जागतिकीकरणाच्या गदारोळात हरवत चाललेला गाव, कृषिसंस्कृतीची विस्कटत चाललेली घडी, निसर्ग, राजकारण,भ्रष्टाचारी व्यवस्था यांच्याकडून होत असणार सामान्य माणसाचं शोषण, शेतकऱ्यांची सर्व बाजूंनी होत असलेली लुबाडणूक, माणसाला एकटेपणातून येऊ लागलेले अस्वस्थपण या सर्वांचे चित्रण पाटील यांची कविता करते. केवळ चित्रण करूनच ती थांबत नाही तर मानवी जीवनाच्या अस्तित्वाचं तत्त्वज्ञान ती शोधू पाहते. अटळ मृत्यू आणि क्षणभंगुर मानवी जीवन अधोरेखित करते. ती जागतिकीकरणाच्या रेट्यात हतबल झालेल्या माणसाचे चित्रण करते .

ती व्यक्तिकेंद्रित राहत नाही तर अवघ्या माणसांच्या अंतर्मनाला ती साद घालते.मुक्तछंद आणि भावकविता अशा दोन्ही काव्यशैलीतून तिचा प्रवास होताना दिसतो. उपहास उपरोधापेक्षाही साधेपणाने व नेमकेपणाने ती व्यक्त होते. त्यामुळे ती दुर्बोध झालेली नाही.तिच्यात विद्रोही सूर आढळत नाही. ती संवादी झाली आहे. प्रदीप पाटील यांच्या कवितेने आपला ठसा उमटवत आधुनिक कवितेच्या प्रवाहात निश्चितपणे भर घातली आहे.

---

**पान नं. १४ वरुन** त्यात प्रभावाने सूक्ष्मता दिसते. त्यांच्या कक्षा- अवकाश निश्चित आहेत. भावानुभवाचे वा विचारानुभवाचे तार्किक विश्लेषण रुक्ष नसते. मोजक्या शब्दांचा तिरकस (वक्रोक्तीपूर्ण) उपयोजन करुन तरल भावस्थितीचे चित्रण ह्या संग्रहात आधिक्याने येते. त्याला Personification चा स्तर लाभतो. कवीची अनुभूती स्वतःची तात्त्विक असल्याने जीवन व्यवहारातील मूल्य- ऱ्हासाबरोबर सत्याचा शोध घेते. त्यामुळे विचारगर्भ जीवनाची जाणीव 'व्यालेली' दिसते ती 'डंख' जाणीव म्हणूनच. त्यामुळे ही कविता जेवढी वाचनीय तेवढीच मननीय आहे. फक्त एवढेच म्हणता येईल, "There can be no finality in thinking.' ही चिंतनशिलता पुढे सातत्याने सुरु आहे.

या दुसऱ्या आवृत्तीत याच प्रेरणेच्या समांतर असलेल्या काही कविता नव्याने समाविष्ट केल्या आहेत. त्या कवितांमधून डॉ. देवरे यांचे अनुभवक्षेत्र विस्तारुन, त्यांची कक्षाही विशाल झालेली दिसून येते. चिंतनशीलता हा त्यांच्या काव्य प्रतितीचा गुंणधर्म आहे, अशीच ती उत्तरोत्तर वाढत राहील ही Potentiality या कवितासंग्रहाने दर्शवली आहे. स्वागत आणि शुभेच्छा.

---

**धन्यवाद आणि आभार!**

कोरोनाच्या या आपत्तीचे काळात अंकाचे प्रकाशन ही अतिशय कष्टप्रद कृती होती. परंतु संपादक मंडळातील आमचे सहकारी प्रा. डॉ. सुधाकर शेलार यांनी मार्च २०२१ मध्ये अर्थिक मदतीचे आवाहन केले आणि अनेक हितचिंतक मित्र अभ्यासकांनी मदतीचा हात दिला त्या सर्वांना धन्यवाद व त्यांचे आभार!